**महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८**

**जाहिरात क्र .४३/२०१८**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी, घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा, (मुख्य) परीक्षा-२०१८ या परीक्षेचा निकाल **दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला आहे. मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

**२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात आला आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**३. मुख्य परीक्षेव्दारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरिता अधिसुचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या Profile मध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) आयोगास Online पध्दतीने Link Open** झाल्यापासून आठ दिवसाच्या आत पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहीत धरला जाईल. उक्त उल्लेखित Online पध्दतीखेरिज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला पसंतीक्रम ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच याबाबत कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

**४.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित **गट- 'अ' व 'ब'** पदासाठी निश्चित केलेली क्रिडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच **दिनांक ४ एप्रिल, २०१८** रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईल पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र.३.८ कृपया पहावी.)

**दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०१९**
**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-१**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**